**जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत तसेच जलयुक्त शिवार अभियान व्यतिरिक्त इतर ठिकाणी मृद व जलसंधारण उपचाराची सर्व कामे करण्यासाठी अल्प कालावधी निविदा सूचना प्रसिध्द करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## जलसंधारण विभाग

**शासन निर्णय क्रमांकः अनिसु -२०१७ /प्र.क्र.४६१ /जल-७**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १९ सप्टेंबर, २०१७

**वाचा:**

१) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र. सीएटी -१०/२००६ /प्र.क्र.१३३/ इमा-२, दिनांक २ नोव्हेंबर, २००६.
२) शासन परिपत्रक क्र. सासिबं-२०१४ /प्र.क्र.४ (भाग-२)/जल-७, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१४ व दिनांक ४ जुलै, २०१४ चे परिपत्रक
३) शासन निर्णय क्र. जलशि - २०१५ / प्र.क्र.६८ / जल - ७ दिनांक २१ फेब्रुवारी २०१५
४) शासन परिपत्रक क्र. जलशि - २०१५ / प्र.क्र. २३३ / जल - ७ दिनांक १५ मे २०१५
५) शासन परिपत्रक क्र. अनिसु-२०१५/प्र.क्र.६१२/जल-७ दिनांक २३ डिसेंबर, २०१५
६) शासन परिपत्रक क्र. अनिसु - २०१६ / प्र.क्र. ६१ /जल - ७ दिनांक ६ फेब्रुवारी, २०१६ व २४ मे, २०१६
७) शासन परिपत्रक क्र. अनिसु -२०१६/प्र.क्र.५६०/जल-७ दिनांक १६ सप्टेंबर, २०१६
८) शासन निर्णय क्र. अनिसु-२०१७/प्र. क्र. १९६/जल-७ दिनांक १३ एप्रिल २०१७

**प्रस्तावना:**

राज्यात वारंवार उद्भवणाऱ्या टंचाई परिस्थितीवर कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून शासन निर्णय दिनांक ५ डिसेंबर, २०१४ अन्वये जलयुक्त शिवार अभियाना राबविण्यात येत आहे. जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रम राज्य शासनाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम असून सन २०१८-१९ पर्यंत राबविण्यात येणार आहे. या अभियानातर्गत दरवर्षी ५००० गावे निवडून टंचाईमुक्त करण्याचे ठरविण्यात आले आहे. जलयुक्त शिवार अभियान अभियानांतर्गत तसेच जलयुक्त शिवार अभियान व्यतिरिक्त इतर ठिकाणी मृद व जलसंधारण उपचाराची कामे उदा. कंपार्टमेंट बंडिंग, सिसिटी, गॅबियन बंधारे, सिमेंट बंधारे, दुरुस्तीची कामे व इतर सलंग्न कामे मोठया प्रमाणात हाती घेण्यात येत आहेत.

२. मृद व जलसंधारण उपचाराची कामे करताना उपचाराची स्थळ निश्चिती करणे, सर्वेक्षण करणे, कामांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेणे, तदनंतर निविदा प्रक्रिया करून प्रत्यक्ष कामे करावी लागत असल्याने यासाठी बराच कालावधी लागतो. यामुळे जलयुक्त शिवार अभियानांतर्गत व जलयुक्त शिवार अभियान व्यतिरिक्त इतर ठिकाणी घेण्यात येणारी मृद व जलसंधारण उपचाराची कामे उदा. कंपाट्र्मेंट बंडिंग, सिसिटी, गॅबियन बंधारे, सिमेंट बंधारे, दुरुस्तीची कामे व इतर सलंग्न कामे निर्धारित वेळेत पुर्ण करण्याच्या दृष्टीने पूर्वीप्रमाणेच निविदा कालावधी कमी ठेवणे ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :**

जलयुक्त शिवार अभियान राज्यात सन २०१५-१६ पासून राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत व अभियान व्यतिरिक्त इतर ठिकाणी घेण्यात येणारी मृद व जलसंधारण उपचार कामे उदा. कंपाट्र्मेंट बंडिंग, सिसिटी, गॅबियन बंधारे, सिमेंट बंधारे, दुरुस्तीची कामे व इतर सलंग्न कामे निर्धारित वेळेत पुर्ण करण्याच्या दृष्टीने पूर्वीप्रमाणेच सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय दिनांक ०२ नोव्हेंबर २००६ नुसार दिलेला निविदा कालावधी खास बाब म्हणून कमी करून पुढील तक्त्यामध्ये नमुद केल्यानुसार दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **कामाच्या निविदेची किंमत** | **निविदा सूचना क्रमांक व कालावधी** | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रथम | द्वितीय | तृतीय |
| १ | रु.५.०० लाखापेक्षा कमी किंमतीची कामे | ७ दिवस | ५ दिवस | ३ दिवस |
| २ | रु.५.०० ते ५०.०० लाखांपर्यंतची किमतीची कामे | ७ दिवस | ५ दिवस | ३ दिवस |
| ३ | रु.५०.०० लाखापेक्षा अधिक किंमतीची कामे | ७ दिवस | ५ दिवस | ३ दिवस |

२. सदर आदेश आपल्या अधिपत्याखाली सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून सदर कामे तातडीने पूर्ण होतील याबाबत दक्षता घ्यावी.

३. सदर शासन निर्णयान्वये कमी करण्यात आलेला निविदा कालावधी (अल्प कालावधी निविदा) दिनांक ३१ मार्च २०१८ पर्यंत राहील.

४. सदर शासन शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९१९१५१४२४५४२६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Narayan Karad

Digitally signed by Narayan Karad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RD and WCD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fc35aa8ffade5bb6105200693c60a32b755f7e67f72965b8dd57adaa570981f1, cn=Narayan Karad
Date: 2017.09.19 16:52:10 +05'30'

(ना.श्री.कराड)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा. सभापती, विधानपरिषद यांचे सचिव
३. मा. अध्यक्ष, विधानसभा यांचे सचिव
४. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधान परिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
६. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधान परिषद व संसद सदस्य.
७. मा.मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
८. मा.राज्यमंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
९. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
१०.अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव मंत्रालय, मुंबई.
१२.आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
१३.आयुक्त (मृद व जलसंधारण), औरंगाबाद
१४. सर्व विभागीय आयुक्त
१५.संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे.
१६.मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे.
१७.प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१९.महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता).
२०.सर्व अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ
२१.सर्व विभागिय कृषि सहसंचालक
२२.सर्व जिल्हाधिकारी,
२३.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
२४.सर्व कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) / जिल्हा परिषद / जलसंपदा

२५.सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

२६. महालेखापाल , महाराष्ट्र राज्य , मुंबई/ नागपूर (लेखा परीक्षा व लेखा व अनुज्ञेयता).

२७.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

२८.   निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.

२९.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

३०.सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव/ कार्यासन अधिकारी, ज. सं. विभाग,

३१.कार्यासन जल-१, ३, ४,८ व २० ग्रा. वि. व ज. सं. विभाग मंत्रालय, मुंबई.

३२.जल-७, निवड नस्ती.